आनंद बक्षी: प्रतिभेचा खळाळता झरा

आनंद बक्षींचे जीवलग मित्र शक्ती सामंत यांनी आपल्या या मित्राच्या आठवणींना उजाळा दिला तेव्हा...

□ विजय अकेला

आनंद बक्षी आणि शक्ती सामंत यांची मैत्री इंडस्ट्रीत कोणाला माहीत नाही? दोघांच्या या मधुर संबंधांची परिणती 'मेरे सपनों की रानी...', 'आज न छोडेंगे बस हमजोली...', 'ये क्या हुआ...', 'हम दोनो दो प्रेमी...', 'मेरे नयना सावन भादों...' सारखी जवळजवळ दोनशे गीतं जन्माला येण्यात झाली. या दोघांची दोस्ती फक्त व्यावसायिक पातळीवरच नाही तर वैयक्तिक पातळीवरही तेवढीच गाढ होती.

शक्ती सामंत म्हणतात, 'मी *आराधना* सुरू करणार होतो तेव्हा आर.डी.बर्मननी माझा आनंदजींशी परिचय करून दिला. मी त्यांना सहज म्हटलं . आप के पास क्या है, जरा सुनाइए तो. त्यांनी मला त्यांच्या पोतडीतलं एक गीत ऐकवलं. ते होतं, 'मैने पूछा चांद से देखा है कही मेरे यार सा हसी...'

मला ते गीत इतकं आवडलं की या माणसाकडे अनन्यसाधारण प्रतिभा आहे हे माझ्या तेव्हाच लक्षात आलं. मी *आराधना*ची सिच्युएशन त्यांना ऐकवली त्यावर त्यांनी तिथे बसल्याबसल्याच गीत लिहिलं, 'कोरा कागज था ये मन मेरा...' त्या चित्रपटाची एकूण एक गीतं हिट ठरली. नंतर मी *कटी पतंग*ची घोषणा केली तेव्हा त्यांनी आपणहून मला एक मुखडा ऐकवला, 'मेरी जिंदगी है क्या एक कटी पतंग है...' आमचे सूर खऱ्या अर्थाने जुळले होते म्हणायचे.


मी *अनुराग*ची योजना आखली. त्यात आनंद बक्षींनी लिहिलेलीच सगळी गीतं होती. एक दिवस संध्याकाळी ते माझ्या ऑफिसमध्ये लवकर आले. अस्वस्थ दिसत होते. मी त्यांच्या अस्वस्थततेचं कारण विचारल्यावर म्हणाले, 'यार, इतक्या लांबून गीत ऐकायला बोलावलं आणि आता म्हणतात पसंत नाही.' त्यांच्यातल्या गीतकाराची ती व्यथा होती. मी हळूच विचारलं, कोणतं गीत? बोल होते, 'वो क्या है, एक मंदिर है...'

मी लगेच त्यांना म्हटलं, नाराज कशाला होता? माझ्या या चित्रपटातली नायिका आंधळी आहे. तिच्यावर हे गीत चित्रित केलं तर अगदी फिट्ट बसेल. अशा रितीने नायक-नायिकेवर आम्ही ते गीत चित्रित केलं आणि चांगलंच हिट झालं.

बक्षीजींना गाण्याचीही दांडगी हौस. त्यांनी मला आणि सचिनदांना हे गीत स्वतः गाऊन दाखवलं. सचिनदांनी ते स्वरबद्ध केलं तरी धून बक्षीसाहेबांच्या मूळ गाण्यातलीच ठेवली. बक्षीसाहेबांना अनेकदा अशारीतीने धून तयार करताना पाहून एकदा मी त्यांना शंभर रुपये देऊन म्हटलं माझ्या आगामी चित्रपटाचे संगीतकार म्हणून ती त्यांची सायनिंग अमाऊंट आहे.

बक्षीजींशी ओळख झाल्यावर अवघ्या काही दिवसांतच आम्ही चांगले मित्र बनलो होतो. आमच्या ग्रुपमध्ये इतरही मित्र होतेच. त्यातही पंचम आणि राजेश खन्ना हे अधिक जवळचे वाटत. रोज संध्याकाळी आम्ही चौघं एकत्र जमून खूप मौजमजा करत असू.

आनंद बक्षींनी बरीचशी गाणी माझ्या घरी बसूनच लिहिली आहेत. प्रसंग सांगितला की क्षणार्धात त्याच्यावर गीत लिहायची त्यांची हातोटी होती. 'चिंगारी कोई भडके...', 'जिस गली मे तेरा घर न हो बालमा...'सारखी असंख्य गीतं त्यांनी केवळ गंमत म्हणून लिहिली होती. पण ती प्रसंगानुरूप चित्रपटांत सामावली गेली आणि सुपरहिट ठरली.



आमने सामनेच्या रेकॉर्डिंगप्रसंगी असीम सामंत, आनंद बक्षी, आर.डी.बर्मन, मिथुन चक्रवर्ती आणि शक्ती सामंत

मी आनंद बक्षींना भाईजान म्हणत असे. सचिनदा तर त्यांना आनंद बक्षी म्हणत. ते मला शक्तीसाहेब संबोधत. पण ही औपचारिकता आमच्या नात्यात कधीच नव्हती. ते आजारी झाले तेव्हा मी दर दोन दिवसांआड त्यांची विचारपूस करायला जात असे. एकदा मी अशीच त्यांची खुशाली विचारायला गेलो असताना माझ्या नव्या चित्रपटाचं कथानक ऐकवलं. त्यांनी लगेच आपल्या उत्साही स्वभावानुसार 'बरा झाल्यावर मी या चित्रपटासाठी गीतं लिहीन' असं आश्वासनही मला दिलं.

नंतर त्यांचं निधन झालं. माझ्या ज्या चित्रपटासाठी गीतं लिहायची बक्षीजींची तीव्र इच्छा होती तो चित्रपट त्यांच्या गीतांशिवाय पूर्ण होऊच शकत नव्हता. मी तो नंतर कधीच केला नाही. इंडस्ट्रीतलं त्यांचं योगदान आपण कधीही विसरू शकणार नाही.